**सं.फौ.खटला क्र. ५४८/२०२२**
**सरकार –वि- गणेश**
**नि.क्र.१० पुढे**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०१
मी शपथेवर खरे सांगतो की,
नाव – गोविंद नेतराम दमाहे, वय - ५१ वर्ष,
कामधंदा - शेती,
रा. चोरखमारी, तह. मोहाडी व जि. भंडारा

**अभियोग पक्षातर्फे सरतपासणी विद्वान वकील सौ. महांकाळ यांच्यामार्फत -**

**१.** पोलीसांनी मला सुचनापत्र देवून पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले नाही व माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नाही. माझ्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. मात्र पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या. सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा, रिकाम्या शिशीचा पंचनामा आणि जप्ती पंचनामा यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर मला माहीत नाही.

**साक्षीदार फितुर घोषित करुन साक्षदारास सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी विद्वान सरकारी वकीलानी मागीतली, परवानगी मंजुर-**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७/०८/२०२२ रोजी पोलिसांनी मला मौजा खमारी येथे आरोपीच्या राहते घरी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच ज्ञानेश्वर बंधाटे हे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी आरोपीच्या ताब्यातून एकूण ०४ लीटर हातभट्टी मोहादारु आणि इतर साहित्य मिळून आले आणी ते माझ्यासमक्ष जप्त करुन त्यातून सि.ए. परीक्षणाकरिता एका काचेच्या शिशीत १८० मिली प्रत्येकी वेगळा काढण्यात

आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला व ते बरोबर असल्याने मी त्यावर सहया केल्या. मी आरोपीस ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस वाचविण्याकरीता आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे –**

**३.** नाकारला.

**४.** फेरतपास नाही.

माझ्या समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-

(बी. आर. पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, मोहाडी

०६/०२/२०२३